# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/06/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा वडोदा शिवार मौदा येथे दिनांक १७/०६/२०२३ चे २०.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन ट्रक क्र. एम. एच—४० बि.एल— ५४९८ मध्ये एक इसम जनावरे भरीत होता. फिर्यादी यांना पाहताच तो अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. ट्रकमध्ये १२ बैल ९ गोरे त्यांचे हात पाय दोर खंडाने बांधुन त्यांना क्लेश प्रमाणे वागणुक देवुन त्यांची कुठलीही चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता वाहनात श्वास न घेतला येईल अशा प्रकारे वाहनात कोंबुन कत्तली करीता अवैध्यरीत्या भरून मिळुन आले. तसेच ट्रक उभा असलेल्या मागील बाजुस १३ गोरे व १ गाय झाडी झुडपीत बांधुन दोरखंडाने बांधुन त्यांची चारा पाण्याची कुठलीही व्यवस्था न करता आढळुन आल्याने १२ बैल प्रत्येकी किंमती अंदाजे २०,०००/—रू एकुण २,४०,०००/—रू एकुण २२ गोरे प्रत्येकी किंमती १०,०००/—रू एकुण किंमत २,२०,०००/—रू. एक गाय किंमती १५,०००/—रू एक ट्रक एम. एच.— ४० बि.एल ५४९८ किमती अंदाजे १५,००००/— असा मुद्देमाल मिळुन आला गोवंश मुद्देमाल गौशाळे मध्ये जमा केला व ट्रक पोलीस स्टेशनला जप्त केला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नायक संजय अनिल बरोदीया ब. नं. २१५६ पो.स्टे मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (डी) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५ ए, ९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर मो. नं. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत २५ किमी अंतरावर मौजा सालई फाटा उमरी शिवार येथे दिनांक १८/०६/२०२३ चे ०२.३० वा. दरम्यान केळवद पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन स्कॉर्पिओ गाडी क्र. एम. एच.— ३० ई. के.— ०२१३ च्या चालकाने आपले ताब्यातील करडया रंगाची स्कॉर्पिओ गाडी मध्ये अवैधरित्या क्रुर व प्राण्यांना निर्दयतेने वाहनात डांबुन अकडुन दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने व अंधाराचा फायदा घेवुन घटनास्थळाहुन पळुन गेला. स्कॉर्पिओ गाडी क्र. एम. एच.— ३१ ई. के.— ०२१३ किंमती अंदाजे ३००००/— रू. व १) ०२ नग गाई गौवंश प्रती किंमती अंदाजे १५,०००/— प्रमाणे एकूण ३००००/— रू २) ०२ नग बैल गौवंश प्रत्येकी किंमती अंदाजे २००००/— प्रमाणे एकूण किंमती अंदाजे ४००००/— ३) ०३ नग मृत बैल गौवंश ०० रू. असा एकूण ३७००००/— रुपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे नापोशी दिपक भिमरावजी इंगळे पोस्टे केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे वरील आरोपीविरुध्द कलम २७९, ४२९ भादवी, सहकलम ११(१) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक

अधिनियम १९६० सहकलम ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५, सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ सहकलम १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार किशोर ठाकरे ब. नं. १५४७ पोस्टे केळवद मो. नं. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

३) पो.स्टे. बेला :— अंतर्गत मौजा जैतापुर फाटा येथे दिनांक १८/०६/२०२३ चे ०३.१० वा. ते ०४.२० वा. दरम्यान बेला पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बेला पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन टाटा. एस गाडी क्र. एम. एच.—२७/बि.एक्स.— २९६७ किंमती ४०००००/— रू. तसेच स्वीफ्ट डिझायर गाडी क्र. एम एच.—४९/बि.बि— ०६४१ किंमती अंदाजे ३०००००/— रू याला थांबवुन चेक केले असता **आरोपी नामे— १) शेख आसिफ शेख शब्बीर, वय २९ वर्ष, रा. हिंगणा देवळी सावंगी २) रोहन रत्नदिप मासुरकर, वय २२ वर्ष, रा. मोमीनपुरा रोड मोतीबाग नागपुर ३) सानु अहमद कुरेशी वय ३२ वर्ष, रा. गांधीबाग खदान गांजा खेत के पास नागपुर ४) हुजेर अहमद कुरेशी वय २१ वर्ष रा. पुरानि मस्जिद के पास नागपुर ५) रिजवान शेख प्यारू कुरेशी वय २६ वर्ष, रा अंसार नगर मोमिनपुरा नागपुर** यांनी वाहनात ०९ जनावरे किंमती ९००००/— रूपये यांना मानेला बांधुन वाहतुक करतांनी मिळुन आले असा एकुण ७,९०,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी नापोशी अमोल बबन काळे, ब. नं. २०१३ पोस्टे बेला यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे कलम १०९, ३४ भादवी सहकलम ११ (क) (ज) (च) (झ) (ठ) (ड) महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सहकलम कलम ५ (१)(९) महाराष्ट्र प्राणी सरंक्षण कायदा सहकलम ५(१)५(ठ) गोहत्या बंदी कायदा कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय चौधरी पोस्टे बेला मो नं ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**